**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75



वर्ष ५ । अंक १७३ । शुक्रवार २७ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



### श्रीपाद छिंदमच्या शिवद्रोहाचा मुद्दा पुन्हा पेटला

# महापालिका अंदाजपत्रकीय सभेतून छिंदमला दाखवला बाहेरचा रस्ता

**सभागृहात प्रवेश बंदीचा ठराव करण्याची सत्ताधारी-विरोधकांची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी महाराजांबाबत अपशब्द काढल्या प्रकरणी वादग्रस्त ठरलेला माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेवक श्रीपाद छिंदमला आज महापालिका अंदाजपत्रकीय सभेतून बाहेर काढण्यात आले. सत्ताधारी व विरोधकांनी आक्रमक होत छिंदमला बाहेरचा रस्ता दाखविण्याबरोबरच शिवद्रोही छिंदमला सभागृहात प्रवेश बंदीचा ठराव करण्याची मागणी केली. त्यामुळे श्रीपाद छिंदमच्या शिवद्रोहाचा मुद्दा पुन्हा पेटला असल्याचे दिसून येत आहे.



महापालिकेची अंदाजपत्रकीय सभा आज शुक्रवारी आयोजित करण्यात आली होती. या सभेसाठी सभागृहात आलेल्या श्रीपाद छिंदम विरोधात सत्ताधारी व विरोधक आक्रमक झाले व त्यांनी छिंदमला सभागृहाच्या बाहेर काढून दिले.

छिंदमला सभागृहात बोलण्याचा व बसण्याचा अधिकार नाही. त्याला प्रवेश न देण्याचा ठराव करा, त्याला बाहेर काढा, असे म्हणत सर्व नगरसेवकांनी सभात्याग करण्याचा इशारा दिला. सत्ताधारी व विरोधक छिंदम विरोधात आक्रमक झाल्याचे पहावयास मिळाले.

#### नेमके काय घडले?

अंदाजपत्रकीय चर्चा सुरू असताना श्रीपाद छिंदम याने बजेटवरील चर्चेत सहभाग घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संपत बारस्कर, गणेश भोसले, मयूर बांगरे, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, विकी जगताप यांनी त्याला सभागृहात बसण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी केली. भाजपाचे नगरसेवक अमोल येवले यांनीही त्याला पाठिंबा दिला. त्यापाठोपाठ शिवसेना शिंदे व ठाकरे गटानेही त्याला सभागृहातून बाहेर काढावे, अशी मागणी केली. तसेच अजेंड्यावरील विषयांच्या पुस्तिका भिरकावून दिल्या. संपत बारस्कर यांनी छिंदम याला सभागृहात न थांबता बाहेर जाण्याबाबत सांगितले. त्यानंतर काही नगरसेवकांनी आक्रमक होत त्याच्या दिशेने धाव घेतली. सर्वांनी मिळून त्याला सभागृहातून बाहेर काढले.

#### छिंदमला सभागृहात बंदीचा विषय पुढच्या सभेत अजेंड्यावर ?

ज्या व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला, त्याला सभागृहात प्रवेश देण्यात येणार नाही. याबाबत कायदेशीर मार्गाने अजेंड्यावर विषय घेऊन निर्णय घ्यावा. यापूर्वीही त्याला त्याचे पद रद्द करून सभागृहातून काढून टाकले होते. आता पुन्हा ठराव करण्यात यावा. पुढच्या सभेत हा विषय अजेंड्यावर नसेल, तर आम्ही सभागृहात थांबणार नाही, असा इशारा संपत बारस्कर व इतर नगरसेवकांनी दिला. त्यामुळे पुढील सभेत छिंदमच्या सभागृह बंदीचा विषय अजेंड्यावर येण्याची शक्यता आहे.



श्रीराम नवमीनिमित्त अहिल्यानगर शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीस युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी आमदार संग्राम जगताप स्वतः मिरवणुकीत सहभागी झाले होते. (छाया - राजु खरपुडे, नगर)

## गॅस रिपेरिंग करणारा आरोपी जेरबंद

**एलसीबीची गुलमोहर रस्ता परिसरात कारवाई । ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एकीकडे गॅस टंचाई निर्माण झालेली असताना घरगुती गॅसटाक्यांमधून व्यावसायिक गॅस टाक्यांमध्ये रिफिलिंग करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई केली. शहानवाज शौकत सय्यद (वय -२४ वर्षे रा. दर्गा दायरा जवळ, दगडी चाळ, मुकुंदनगर) असे आरोपीचे नाव असून या कारवाईत एकूण ३३ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसरा आरोपी फरार आहे.

एलसीबीचे पथक दिनांक २६ रोजी नगर शहरात पेट्रोलिंग करीत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, साद खान हा त्याच्या गुलमोहर रोड, ■ पान ४ वर



## गावठी कट्टा बाळगणारा सोनई शिवारातून ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसासह आरोपी अमोल रावसाहेब विटनोर (वय २७, रा. मांजरी ता. राहुरी) याला जेरबंद केले आहे.

दिनांक २६ रोजी पथक हे सोनई पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, अमोल रावसाहेब विटनोर हा सोनई ते खेडले परमानंद रोडवर श्रीरामवाडी परिसरात कॅनलवर त्याच्या कब्जात विनापरवाना अग्निशस्त्र बाळगून थांबलेला आहे. त्यानुसार पथकाने नमूद ठिकाणी जाऊन खात्री केली असता आरोपी गावठी कट्ट्यासह आढळून आला. त्याच्याकडून गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे असा ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यاप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली ■ पान ४ वर

# मनपा कामगारांचे कामबंद आंदोलन; पगार रखडल्याने प्रशासनाविरोधात संताप

**। फेब्रुवारी-मार्चचा पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांचे ठिय्या आंदोलन । बजेट महासभेवरही प्रश्नचिन्ह; ठोस आश्वासनाशिवाय काम सुरू करणार नाही - युनियन । कर्जाचे हप्ते, आर्थिक अडचणीत सापडले कर्मचारी**





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी व मार्च महिना संपत आला तरी पगार न झाल्यामुळे कर्मचारी संतप्त झाले असून महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. प्रशासकीय इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

पगार रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. कर्जाचे हप्ते, मुलांच्या शाळेची फी, तसेच आजारपणाचे खर्च भागवणे कठीण झाले असून अनेक कर्मचारी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, आज महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची बजेट महासभा होणार असून, कर्मचाऱ्यांच्या कामबंद आंदोलनामुळे या सभेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

यावेळी कामगार युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल म्हणाले की, फेब्रुवारी महिना संपून मार्चही संपत आला तरी कर्मचाऱ्यांना पगार मिळालेला नाही. त्यामुळे कर्मचारी अत्यंत कठीण परिस्थितीत आहेत.

ते पुढे म्हणाले की, जोपर्यंत प्रशासनाकडून पगाराबाबत ठोस आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत कर्मचारी कामकाज सुरू करणार नाहीत. प्रशासनाने तात्काळ यावर तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. महानगरपालिगकेतील पगारप्रश्न गंभीर बनला असून, यामुळे प्रशासन व कर्मचाऱ्यांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रश्नावर तातडीने तोडगा निघणे गरजेचे असल्याची भावना कर्मचारी व्यक्त करीत आहे.

## राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली - धनंजय जाधव

**राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती अहिल्यानगर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले आहे.मानवांनो माणुसकीला जागा,जरा माणसात मिसळूनी वागा.असा दिव्य संदेश महान तपस्वी राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी दिला आहे. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी प्रत्येकाने माणुसकीचा धर्म पाळावा.असे सांगितले आहे.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांचे विचारांचे अनुकरण केल्यास जीवन सफल होईल.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली.असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालय येथे अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.यावेळी भजन व प्रवचनाचा कार्यक्रम झाला.अहिल्यानगर येथील कैकाडी समाज संघटनेने महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीला जाहीर पाठिंबाचे पत्र दिले आहे.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची महाआरती उपमहापौर धनंजय जाधव,माजी उपमहापौर गणेश भोसले,नगरसेवक प्रकाश भागानगरे,पै.महेश लोंढे, यांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### आरती भोसले हिची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धे करीता निवड



अहिल्यानगर- नुकत्याच संभाजीनगर येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण येथील प्रशिक्षण केंद्र येथे महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेने राज्य निवड चाचणी स्पर्धा घेतल्या त्यामध्ये अहिल्यानगर जिल्हा बॉक्सिंग संघाची खेळाडू आरती भोसले हिची ७५ ते ८१ किलो वजन गटात निवड झाली असून ३० मार्च ते चार एप्रिल दरम्यान पुणे येथे होणाऱ्या ''२ चिफ ऑफ आर्मी स्टाफ () २०२६ टूर्नामेंट या राष्ट्रीय स्पर्धे करीता तिची महाराष्ट्र संघात निवड झाली असून आरती भोसले हीने यापूर्वीही राज्य स्पर्धे त अनेक सुवर्णपदके पटकावून राष्ट्रीय स्पर्धे सुद्धा पदके पटकावली आहे. ती सध्या दिल्ली येथील सीमा सुरक्षा पोलीस बल येथे कार्यरत असून तिस बॉक्सिंग प्रशिक्षक शकील अहमद शेख तसेच एनआयएस प्रशिक्षक मुकेश कुमार यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले असून तिस नगर शहराचे लोकप्रिय आमदार संग्राम भैय्या जगताप, बॉक्सिंग संघटनेचे उपाध्यक्ष सुमतीलाल जी कोठारी, कर्नल दिलीप परब, नरेंद्र फिरोदिया व उद्योजक महावीर ग्रुपचे संचालक राजेशजीभंडारी यांनी तिचे अभिनंदन केले करून शुभेच्छा दिल्या.

### ५ एप्रिलला मढीत 'शिव पाणंद'चे राज्यस्तरीय अधिवेशन



अहिल्यानगर- राज्यातील शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन येत्या ५ एप्रिल रोजी श्री क्षेत्र चैतन्य कानिफनाथ देवस्थान, मढी (ता. पाथर्डी) येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनासाठी देवस्थान ट्रस्टकडून चळवळीला मोलाचे सहकार्य देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. शिव पाणंद शेत रस्ते चळवळीने राज्यभरातील रस्तेग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासन पातळीवर महत्त्वपूर्ण आदेश काढून अभूतपूर्व यश मिळवले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, हा या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे. अधिवेशनात महसूल, भूमी अभिलेख, पोलीस विभाग तसेच कायदेशीर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार असून, विविध समस्यांवर सखोल चर्चासत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच, ज्या तालुक्यांमध्ये उल्लेखनीय काम झाले आहे, त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांचा सन्मान केला जाणार आहे. अडचणी निर्माण होणाऱ्या तालुक्यांतील समस्यांचे विश्लेषण करून संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञांशी विचारविनिमय करण्यात येणार आहे.

या संदर्भात शासकीय विश्रामगृहात चळवळीचे प्रणेते शरदराव पवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीत अधिवेशनाचे नियोजन अंतिम करण्यात आले. अधिवेशनाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी निश्चित करण्यात आली आहे.

राज्यातील सर्व जिल्हे व तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी स्थानिक पातळीवरील समस्या, नियमबाह्य व बेकायदेशीर प्रकरणांची माहिती मुद्देसूद स्वरूपात राज्य कार्यकर्त्यांकडे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय, भविष्यात कार्यकर्त्यांसाठी ऑनलाइन बैठक, प्रशिक्षण वर्ग आणि सेवानिवृत्त तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचे नियोजन करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना अतिक्रमित, बंद किंवा अडवलेल्या शिव पाणंद व वहिवाटीच्या रस्त्यांबाबत निवेदन देण्यात आले. कार्यक्रमाच्या तयारीसाठी उपजिल्हाधिकारी गणेश मरकड तसेच देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी व चळवळीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या अधिवेशनामुळे राज्यातील शेतकरी बांधवांच्या शेतरस्त्यांच्या प्रश्नांना दिशा मिळून पुढील

# उद्या आनंदधाम येथे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य प. पुज्य आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतिदिना निमित्ताने आनंदधाम येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सकाळी ७.३० वा. नवीपेठ जैन धर्मस्थानक येथून शांतीमार्च निघणार असुन यामध्ये महिलांनी लाल साडी व पुरुषांनी श्वेत रंगाचे कपडे घालावेत. शांती मार्च नवीपेठ स्थानक येथुन निघुन शहराच्या विविध मार्गावर धार्मिक परिक्षा बोर्ड येथे जाणार आहे. तेथील आनंद दरबार येथे अनेक साधु–साध्वींच्या उपस्थितीत सकाळी ९ वा. गुरु गुणानुवाद सभा होणार आहे. यावेळी महाराष्ट्र प्रर्वतक कुंदनऋषिजी म.सा. , प्रबुध्द विचारक आदर्शऋषिजी, अलोकऋषिजी म.सा., महासती सेवाभावी सत्यप्रभाजी म.सा., पू. दिव्य दर्शनाजी, पू. सम्यकदर्शनाजी, पू. कंचनकंवरजी, पू. अर्चनाजी (मिरा), पू. चंदनबालाजी, पू. अनुपज्योतीजी, राजस्थानी प्रवर्तिनी सुधाजी म.सा., पू. आभाजी म.सा. आदि साधु साध्वी संत आचार्यश्रींच्या जीवनावर प्रवचन देणार आहेत. तसेच मानवसेवा समिती , धार्मिक परिक्षा बोर्ड, अहिल्यानगर आयोजित, मर्चंट बँक प्रायोजित भव्य रक्तदान शिबीर धार्मिक परिक्षा बोर्ड येथे सकाळी ९ ते ५ आयोजित केले आहे. या शिबीराचे उद्घाटन मर्चन्ट बँकेचे अध्यक्ष श्री. हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते होणार असुन अध्यक्षस्थान धार्मिक परिक्षा बोर्डाचे अध्यक्ष श्री. नेमीचंदजी चोपडा (पाली, राजस्थान) भुषविणार आहेत. यावेळी आमदार श्री. संग्राम भैय्या जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर श्री. धनंजय जाधव, मनपा आरोग्य अधिकरी, सर्व आजी माजी नगरसेवक, मर्चन्टस बँकेचे सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत, सुमारे २००० बाटल्या रक्त संकलन करण्याचा मानस संयोजकांनी व्यक्त केला आहे.

तसेच सायंकाळी ७ वा. प्रसिध्द संगीतकार राम शंकर व इंडियन आयडॉल फेम स्नेह शंकर यांचा मंत्रमुग्ध करणारा भक्तीसंध्या कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत व्यापारी मित्र मंडळातर्फे गौतमप्रसादीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी २८ मार्च रोजी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

मानसेवेची शिकवण देणार्या राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषिजी म.सा. यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करण्यासाठी देशभरातून जैन साधु–साध्वीसह भाविक नगरमध्ये दाखल झाले आहे.

# प.पू.राधाकृष्ण महाराजांचा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

**नगरमध्ये जय्यत तयारी सुरू : नियोजन बैठक उत्साहात संपन्न**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जोधपूर येथील प.पू.गोवत्स श्री राधाकृष्ण महाराजांचा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा नगर शहरात आयोजित करण्यात आला असून त्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. या सोहळ्याची नियोजन बैठक पटेलवाडी मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या बैठकीस शहरातील वैष्णव समाजातील मान्यवर प्रतिष्ठित आणि भाविक मंडळी उपस्थित होती.

दि.३ एप्रिल ते ९ एप्रिल २०२६ दरम्यान दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये श्री.रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवाराने या कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन केले आहे.

दीपप्रज्वलनाने बैठकीचा श्रीगणेशा करण्यात आला. शरद झंवर यांनी प्रास्ताविक केले. कल्पेश इंदानी व महेश इंदानी यांनी कथेच्या आयोजना संदर्भात माहिती दिली. रामेश्वर बिहाणी व बजरंग दरक यांनी प्रचार, प्रसार संदर्भात मार्गदर्शन केले.

बैठकीस सर्वश्री श्रीगोपालजी धूत, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, राजेंद्र चोपडा, रामनिवास इंदानी, मगनभाई पटेल, प्रदीप पंजाबी आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांनी उपयुक्त सूचना केल्या.

संपूर्ण वैष्णव समाज आणि सर्व नगरकरांसाठी इंदानी परिवाराने या कथा श्रवणाचा अमृत योग घडवून आणल्याबद्दल उपस्थित सर्वांनी इंदानी परिवाराचे अभिनंदन केले. या कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचा शहरासह उपनगरातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन या बैठकीत करण्यात आले.

## स्व. अरुणकाका जगताप जयंतीनिमित्त पांजरापोळ गोशाळेत गाईंना चारा वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ज्येष्ठ नेते स्वर्गीय आमदार अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पांजरापोळ गोशाळेत भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने गाईंना चारा वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे त्यांच्या स्मृतींना अभिवादन करत समाजात प्राणीमात्रांप्रती संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला.

या वेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, महावीर चषक परिवाराचे संस्थापक संजय चोपडा, शैलेश गुंदेचा, अजय गुगळे, महेश मुनोत, अनिल दुगड, हसमुख बोरा, प्रीतम पोखरणा, डॉ. सचिन बोरा, सीए आनंद गांधी, रुपेश भंडारी, किरण पोखरणा, प्रीतम गुंदेचा आदी मान्यवर उपस्थित होते.

स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविले जात असून, पांजरापोळ गोशाळेत गाईंना चारा वाटप करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या उपक्रमामुळे समाजात सेवाभाव आणि करुणेची जाणीव दृढ होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सध्या वाढत्या उन्हामुळे हिरव्या चाऱ्याची कमतरता जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर गाईंना आवश्यक चारा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. पांजरापोळ संस्थेकडून गाईंची योग्य काळजी घेतली जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी बोलताना संजय चोपडा म्हणाले की, स्व. अरुणकाका जगताप यांचे महावीर चषक परिवाराशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांनी नेहमीच सामाजिक कार्यासाठी प्रेरणा दिली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर गाईंना चाऱ्याची गरज ओळखून हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

# रक्तदान हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ कर्तव्य - प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे

**न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये रक्तदान व थॅलेसेमिया तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** न्यू आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज मधील रसायसनशास्त्र विभाग आणि जनकल्याण रक्तपेढी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर व थॅलेसेमिया तपासणी शिबीर पार पडले. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील तसेच इतर विदयाशाखेतील पदवी, पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी रक्तदान शिबीरामध्ये उत्स्फुत सहभाग नोंदविला.

सदर शिबीराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल आठरे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. संजय कळमकर, प्रबंधक बबनराव साबळे, रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. श्रीमती. सुषमा दरे, जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. वसंत झेंडे, थैलेसेमिया आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती मोहिम राबविणारे डॉ. गौरव पठाडे, डॉ. अ‍ॅड. अंजली केवळ यांची प्रमुख उपस्थितीत लाभली.

यावेळी रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. श्रीमती. सुषमा दरे यांनी महाविद्यालयात उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मुल्य रुजली जावीत या हेतूने अशा समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन विभागामार्फत नेहमीच करण्यात येत असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विदयार्थ्यांना रक्तदानाचे महत्व व थेंलेसेमिया आजाराबाबत मार्गदर्शन केले. रक्तदान हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ असे कर्तव्य असून महाविदयालयातील विदयार्थ्यांचा या रक्तदान शिबीरामधील सहभाग समाजाला दिशादर्शक ठरणारा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

## पैठणमध्ये रामनवमी उत्साहात; मठ-मंदिरांत भक्तीचा जल्लोष

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण शहरात गुरुवारी (दि. २६) रामनवमीचा उत्सव मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील विविध मठ–मंदिरांत दिवसभर धार्मिक कार्यक्रम, भजन–कीर्तन व रामायण पारायणामुळे वातावरण भारावून गेले होते.

दुर्गावाडीतील बालाजी मंदिर, जर गल्ली, नाथवाडा, कावळे गल्ली, परदेशी पुरा येथील कृष्ण मंदिर, संतनगरमधील हनुमान टेकडी, जोगेश्वरी मंदिर तसेच सह्याद्री चौक परिसरातील मंदिरांमध्ये भाविकांची लक्षणीय गर्दी पाहायला मिळाली. ठिकठिकाणी रामनामाचा गजर, भजने व कीर्तनांनी शहर दुमदुमून गेले.

त्रेतायुगात प्रभू श्रीराम पैठण येथे आले असता त्यांनी जुन्या तेलवाडीतील गोदावरी काठी महादेव पिंडीची स्थापना केल्याची श्रद्धा आहे. त्या रामतीर्थ स्थळी भाविकांनी दर्शन घेऊन उत्सव साजरा केला. दरम्यान, अमृतराया मठात आयोजित कार्यक्रमात प्रफुल बुवा तळेगावकर महाराज यांच्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. ''रामभक्तीमुळे जीवन आनंदी व सुखमय होते,'' असा संदेश त्यांनी दिला. एकूणच पैठण नगरीत रामनवमी निमित्त भक्तीमय वातावरण निर्माण होऊन रामनामाच्या गजरात उत्सव उत्साहात पार पडला.

## अफवांमुळे पेट्रोल पंपांवर गर्दी; इंधन भरण्यावर निर्बंध लागू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही अफवांमुळे नागरिकांनी पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने हस्तक्षेप करत इंधन भरण्यावर निर्बंध लागू केले आहेत.

जिल्हाधिकारी (पुरवठा शाखा) यांच्या आदेशानुसार दुचाकी वाहनांना जास्तीत जास्त २०० रुपयांपर्यंत, तर तीनचाकी व चारचाकी वाहनांना २००० रुपयांपर्यंतच इंधन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कॅन, बाटल्या किंवा ड्रममध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अनावश्यक गर्दी टाळावी व आवश्यकतेनुसारच इंधन घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्यात येणार आहे. दरम्यान, प्रत्येक पेट्रोल पंपावर उपलब्ध साठा व दररोजची विक्री याची माहिती फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून पुढील आदेश येईपर्यंत लागू राहणार आहे.

## मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी बाबासाहेब मुदगल तर व्हाईस चेअरमन पदी कैलास चावरे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी ज्योतीताई हराळे यांनी पाहिले.

चेअरमन पदासाठी बाबासाहेब मुदगल यांच्या नावाची सूचना संचालक सोमनाथ सोनवणे यांनी मांडली तर अनुमोदन संचालिका प्रमिलाताई पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी कैलास चावरे यांच्या नावाची सूचना संचालक बलराज गायकवाड यांनी केली तर अनुमोदन संचालक अजय कांबळे यांनी दिले.

या प्रसंगी तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, माजी चेअरमन विजय कोतकर, माजी व्हॉइस चेअरमन किशोर कानडे, संचालक सतीश ताठे, विकास गीते, गुलाब गाडे, शेखर देशपांडे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदींसह कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नूतन चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी माझी बिनविरोध निवड झाली असून संचालक मंडळांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याला न्याय देत सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले जातील.

ते पुढे म्हणाले की, यावर्षी पतसंस्थेला सुमारे २ कोटी ११ लाख ८७ हजार ८१२ रुपयांचा नफा झाला असून वसूल भाग भांडवल ५ कोटी ५९ लाख ४१ हजार ३८० रुपये आहे. सभासद ठेव सुमारे २४ कोटी १४ लाख ६८ हजार ८६८ रुपये असून एकूण कर्जवाटप २८ कोटी ५४ लाख २२ हजार ६२० रुपये आहे.

तसेच, यावर्षीपासून परीविक्षाधीन सभासदांना सुमारे १ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सभासदांना आरोग्य तपासणीसाठी तातडीची आर्थिक मदत, तसेच त्यांच्या पाल्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक व विवाहासाठी कर्जरूपी मदत दिली जाते. पतसंस्थेच्या उज्वल भविष्यासाठी आम्ही सकारात्मक काम करू, असेही त्यांनी सांगितले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### केडगावच्या वैष्णव नगरला योगेश्वरी देवीचा होणार उत्सव



अहिल्यानगर- अहिल्यानगरच्या केडगावमधील वैष्णवनगरमध्ये सालाबादाप्रमाणे गुरुवारी दोन एप्रिलला चैत्र पौर्णिमेच्या दिवशी हरिद्वारच्या अखिल विश्व गायत्री परिवार शांतीकुज यांच्या प्रेरणेने योगेश्वरी देवीचा उत्सव होणार असुन, त्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याचे मंदिराचे व्यवस्थापक चंद्रकांत (तात्या) देशमुख यांनी सांगितले आहे. हा सोहोळा तीन दिवस चालणार असुन, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी सर्व भाविक भक्तांना केले आहे.एक एप्रिल ला सायंकाळी स्वर मंदिर भजनी मंडळ व राजलक्ष्मी भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल, तर दोन तारखेला सकाळी नवकुंडीय गायत्री यज्ञ होणार आहे. सायंकाळी वैष्णव नगर च्या मारुती मंदिरापासुन देवीची सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.आरतीनंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल असे आयोजक प्रसाद देशमुख यांनी सांगितले पुजेचे अधिपत्य संदीप जोशी करणार असुन, या उत्सवास भानुदास कोतकर, आमदार संग्राम जगताप, सचिन कोतकर, नगरसेविका सुरेखा कोतकर उपस्थित असणार आहेत. शुक्रवारी पहाटे तीन तारखेला या कार्यक्रमाची सांगता होईल.

### निमगाव वाघा येथे श्रीराम नवमी उत्साहात

अहिल्यानगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्रीराम नवमीचा पवित्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. गेली सलग ३९ वर्षे ही परंपरा कायम राखत दरवर्षी सप्ताहादरम्यान रामजन्मोत्सव साजरा झाला.श्री नवनाथ महाराज मंदिरात हा धार्मिक सोहळा पार पडला. मंदिर परिसरात रामनामाच्या गजराने वातावरण भारावून गेले होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने पाळणा हलवून प्रभू श्रीरामांच्या जन्माचे स्वागत केले. त्याचबरोबर भक्तीगीत, अभंग व भजनांच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्यात आशाबाई ठाणगे, वीना बोडखे, कमल शिंदे, सुनीता डोंगरे, अनिता खांदवे, मंदा खळदकर, लता फलके, सुमन ठाणगे आदी महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. ह.भ.प. विठ्ठल महाराज खळदकर यांनी सांगितले की, ‘‘प्रभू श्रीरामांचा जन्म हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून तो धर्म, नीती, आदर्श आणि कर्तव्यपरायणतेचा संदेश देणारा दिवस आहे. श्रीरामांनी आपल्या आयुष्यात सत्य, संयम, त्याग आणि कर्तव्यनिष्ठा यांचे पालन केले. आजच्या काळात प्रत्येकाने त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याची गरज आहे.

### ऑल इंडिया उलमा बोर्ड च्या जिल्हाध्यक्ष पदी इंजि. इम्रान हाजी अन्वर खान

अहिल्यानगर- ऑल इंडिया उलमा बोर्ड (मुतवल्ली विंग) च्या नुतन कार्यकारिणी मधे नगर जिल्हाधयक्ष पदी सामाजिक कार्यकर्ता इंजिनियर इम्रान हाजी अन्वर खान पत्रकार यांची राष्ट्रीय अध्यक्ष शेख फैसल मोहम्मद इकबाल यांनी मा.राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना नौशाद सिद्दीकी आणि महासचिव अल्लामा बुनई हस्नी यांच्याशी चर्चा करुन निवड केल्याबाबत नियुक्तीपत्र देऊन नुकतेच सन्मानीत केले आहे. भारतातील महाराष्ट्र सह वक्फ च्या जमीनी जतन करणे संदर्भात ऑल इंडिया उलमा बोर्ड मुतवल्ली विंग ची स्थापना करण्यात आली असुन रेल्वे विभागानंतर भारतात वक्फ ची संपत्ती दुसरे क्रमांकावर येत आहे. या वक्फ जमीनींचे खरे उपयोग समाजहितासाठी झाले तर कोणीही उपाशी आणि बैरोजगार राहणार नाही. यासाठी वक्फ बोर्ड च्या जमीनी चे जतन करने, अनाधिकृत ताबेमारी यासाठी मुतवल्ली, ट्रस्टी, मदरसे, आशुरखाना, कब्रस्तान, चिल्ला, दर्गा, मस्जिद, यतीमखाना अशा प्रकारच्या सर्व प्रकरणात मुतवल्ली, ट्रस्टी यांना होत असलेल्या त्रासाबद्दल लोकशाही मार्गाने आवाज उठविण्यासाठी तसेच वक्फ जमीनी वाचविण्यासाठी प्रयत्न करणेकामी संघटना काम करणार असल्याचे ऑल इंडिया उलमा बोर्ड मुतवल्ली विंग चे राष्ट्रीय अध्यक्ष शेख फैसल मोहम्मद इकबाल यांनी सांगितले आहे.

---

भगवान महावीर व्याख्यानमाला - पुष्प पाचवे

# आपल्या मुलांना जीवनाचा आनंद घेऊ द्या - केदार वाळिंबे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आपल्या मुलांवर आपले विचार लादून त्यांचे बालपण हरवेल असे वागू नका. त्यांना जीवनाचा आनंद घेऊ द्या, असे आवाहन शिक्षणतज्ज्ञ केदार वाळिंबे (पुणे) यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी परिचय करून दिला. सिमरन मुनोत यांनी आभार मानले. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आणि हर्ष मुनोत यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, सपना कटारिया आदी उपस्थित होते.

श्री. वाळिंबे पुढे म्हणाले, अलीकडच्या काळात मुलांना जन्म देणे हा मोठा प्रोजेक्ट मानला गेला आहे. आई वडील हे या प्रोजेक्टचे प्रोजेक्ट मॅनेजर आहेत. मुलाने कसे वागावे? कसे राहावे? अभ्यास कसा करावा? कोणत्या विषयाचा करावा? हे सगळे आई-वडील ठरवत असल्यामुळे मुलांचा विचारच केला जात नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शाळेत माझ्या मुलाला शिक्षकांनी रागवायला सुद्धा नको, अशी पालकांची भूमिका तयार झाल्याने शिक्षकांनीही मुलांची जबाबदारी घेणे बंद केले आहे.

आपल्या मुलाला काय पाहिजे? याचा विचार न करता आपल्याला काय पाहिजे ? याचा जास्त विचार केला जात असल्याने उमलणारी मुले कोमेजू लागली आहेत. त्यांना खेळण्या-बागडण्यास वेळच दिला जात नाही! शाळेमध्ये त्याचा दिवस कसा गेला ? हे ऐकून घ्यायला पालकांना वेळच नाही. आपल्या मुलाशी इतर मुलांची तुलना करताना आपल्या मुलाच्या आवडी-निवडीचा, बौद्धिक विकासाचा विचार केला जात नाही. जर्मनी, जपान, इस्त्राईल, स्पेन, फ्रान्स, इटली या जगावर तंत्रज्ञानाने राज्य करणाऱ्या देशांमधील शिक्षण मातृभाषेतूनच दिले जाते, हि वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. जगातील १६ टक्के व्यापार एकटा चीन सांभाळतो मात्र चीनमधील कोणालाही इंग्रजी बोलता येत नाही. भारतामध्येच इंग्रजीचा अट्टाहास केला जातो. इंग्रजी बोलण्यातून फक्त सेल्समनच घडतो, ही वस्तुस्थिती आहे.

आपल्या घरची परिस्थिती, सामाजिक पार्श्वभूमी आणि आपली गरज लक्षात घेऊन मुलांचे शिक्षण झाले पाहिजे. गरजेच्या नसलेल्या गोष्टींमुळे समाजाचा ऱ्हास होत चालला आहे. समाजाला काय वाटेल त्याचा विचार करताना आपल्याला काय वाटेल? हे लक्षात घेणे महत्त्वाचे मानले जात नाही. सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी मुलांवर आपले विचार लादून त्यांना घडवण्याची धडपड करताना मुलांच्या मनाचा, मुलांमधील सुप्त कलागुणांचा विचार केला जात नाही. सर्व प्लॅनिंग पालक करतात. त्यात मुलांना सहभागी करून घेतले जात नाही. त्यातून बालपणीच मुलांचा आत्मविश्वास कमी होत चालला आहे.

विकसित भारत घडवायचा असेल तर मुलांना उमलू द्या. त्यांच्यातील सुप्त कलागुणांचा विकास होईल, याची काळजी घ्या. आपल्या कुटुंबातील आजी-आजोबांसोबत आपली मुलं राहिली तरच ती घराण्याची परंपरा, संस्कृती सक्षमपणे जपतील आणि समर्थपणे जगण्यास उभे राहू शकतील, असे श्री वाळिंबे यांनी ठामपणे सांगितले. विजयकुमारजी मुनोत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेच्या मुख्य प्रायोजक श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आहेत. व्याख्यानास शहरासह उपनगरातील स्री-पुरूष श्रोत्यांची उपस्थिती लक्षवेधी होती.

---

# केडगावला ब्राह्मण सेवा संघातर्फे सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने सोमवार, दिनांक ३ मे २०२६ रोजी सामुदायिक व्रतबंध (मुंज) सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पवित्र सोहळा श्री छत्रपती शिवाजी मंगल कार्यालय, अंबिका नगर, केडगाव येथे संपन्न होणार आहे.

या सोहळ्याचे पौरहित्य वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजी करणार असून, विशेष बाब म्हणजे गुरुजी आजवर या सोहळ्यासाठी कधीही दक्षिणा स्वीकारत नाहीत. ते स्वतःसोबत पाच ते सहा गुरुजींना घेऊन येतात. भिक्षावळीच्या माध्यमातून जमा होणाऱ्या रकमेची संपूर्ण पावती संघाच्या नावाने केली जाते, ही या उपक्रमाची पारदर्शकता दर्शविणारी बाब आहे.

ब्राह्मण सेवा संघ, केडगाव गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने हा सामुदायिक व्रतबंध सोहळा आयोजित करत असून, आजवर महाराष्ट्रातील विविध भागांतून अनेक बटूंनी या सोहळ्यात सहभाग नोंदविला आहे. त्यामुळेच केडगावच्या मुंजीचा नावलौकिक संपूर्ण महाराष्ट्रात पसरला आहे.

हा संपूर्ण धार्मिक व सामाजिक उपक्रम अहिल्यानगर जिल्ह्यातील समाजबांधवांच्या देणगी स्वरूपातील सहकार्यामुळे शक्य होत आहे. अत्यंत अल्प वर्गणीत बटूंना अल्पोपहार, भोजन तसेच संस्कार विधीस लागणारा सर्व खर्च संघातर्फे केला जातो. विशेष म्हणजे, ज्या बटूंच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट आहे, अशा कुटुंबातील बटूंची मुंज मोफत अथवा सवलतीच्या शुल्कात करण्यात येते.

ज्या समाजामध्ये व्रतबंध संस्कार केला जातो, त्या सर्व समाजबांधवांना या सामुदायिक सोहळ्यात सहभागी होता येते. समाजातील अधिकाधिक कुटुंबांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार पोळ यांनी केले आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : नंदकुमार पोळ ७८७५५०००५६ , नंदकुमार कुलकर्णी – ८७८८७३९९३, ज्ञानेश देशपांडे – ९२२६३६१३५७, पंकज जहागीरदार ९०२८८७५५५९, नितीन क्षीरसागर ९४२३३८९५९३, आनंद ठीपसे ९६०४७७४४२३

---

# स्व. अरुणकाका जगताप जयंतीनिमित्त मतिमंद मुलांना आईस्क्रीम वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वर्गीय आमदार अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असताना, मेरिडियन आईस्क्रीम आणि हॉटेल राज पॅलेस यांच्या वतीने मतिमंद मुलांना आईस्क्रीम वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून काकांच्या सेवाभावी कार्याला अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी मोठ्या उत्साहात मुलांना आईस्क्रीम वाटप करण्यात आले. आईस्क्रीम मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून उपस्थितांनाही समाधान वाटले. या छोट्याशा उपक्रमातून आनंद वाटण्याचा मोठा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना उद्योजक राजेंद्र एकाडे म्हणाले की, स्व. अरुणकाका जगताप यांनी आयुष्यभर दीनदुबळ्यांची



सेवा करत गरजू लोकांना मदतीचा हात दिला.

दुसऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देणे आणि त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, हेच काकांचे वैशिष्ट्य होते. आईस्क्रीम हा त्यांचा आवडता विषय होता. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम राबवून त्यांना अभिवादन केले, असे ते म्हणाले.

---

सेवाभावाची उज्वल परंपरा जिवंत

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपातून अरुणकाका जगताप यांना अनोखी आदरांजली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोकनेते स्वर्गीय आमदार अरुणकाका जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधत केडगाव येथील पंचशील फाउंडेशनच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा परिषद शाळा, कांबळे वस्ती येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करून काकांच्या सेवाभावी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मनोगतातून अरुणकाका जगताप यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर आणि नगरसेविका सुनीता महेंद्र कांबळे यांनी सांगितले की, स्वर्गीय अरुणकाका जगताप यांनी आपले संपूर्ण आयुष्य अनाथ, गरीब आणि वंचित घटकांसाठी वेचले. त्यांच्या विचारांचा आदर्श घेत समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम केले, तर तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. तसेच त्यांनी पुढे नमूद केले की, अरुणकाकांची शिक्षणाप्रती असलेली तळमळ ही प्रेरणादायी असून, त्यांचा वारसा जपत विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी अशा उपक्रमांची परंपरा भविष्यातही सुरू ठेवण्यात येणार आहे.

---

# ‘आनंदी जीवन’या व्याख्यानास पोलीस अधिकारी, अंमलदार व कर्मचारी यांचा उस्फूर्त प्रतिसाद

**सक्षम निर्णय,सकारात्मक विचार व आत्मविश्वास यशाची त्रिसूत्री- प्रेरणादायी वक्ते व लेखक दत्तात्रय वारकड**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धावपळीच्या युगामध्ये डिजिटल युग,ए आय सोशल मीडिया यांचा वाढता प्रभाव यामुळे जीवन अत्यंत वेगवान झाले आहे.अशा या धावपळीच्या जीवनामध्ये मानसिक सुखशांती, समाधान आणि आनंदी जीवन जगण्यासाठी सकारात्मक विचारांचे अनुकरण करणे आवश्यक आहे.विचार जीवनावर तर कल्पना जगावर राज्य करतात. जीवनामध्ये नकारात्मक गोष्टींना थारा न देता सकारात्मक गोष्टीवरती जास्तीत जास्त ध्यान आकर्षित करून जीवनामध्ये यश मिळवण्याकरिता सकारात्मक विचारांचा अविष्कार करावा.पुस्तकांचे वाचन केल्याने जीवना कडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो.कर्तव्यपूर्ती करताना आत्मविश्वासाने सामोरे जा.जीवनात सक्षम

निर्णय,सकारात्मक विचार व आत्मविश्वास यशाची त्रिसूत्री आहे.असे प्रतिपादन लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांनी केले आहे.जिल्हा पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथे जिल्हा अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी,अंमलदार व कर्मचारी यांच्यासाठी ‘‘आनंदी जीवन आयुष्याचा



आनंद उत्सव,व्यक्तिमत्व विकास‘‘ या विषयावर लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी,राखीव पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले, सर्व पोलीस स्टेशनचे कर्मचारी व अधिकारी, आरसीएफ फोर्स,क्यू आर टी फोर्स मधील पोलीस कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या राष्ट्राच्या विकासामध्ये असलेल्या महान योगदानाबद्दल सर्व प्रथमतः वक्ते श्री वारकड यांनी उपस्थितांच्या महान कार्याला वंदन केले.सर्व पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्याचे कौतुक केले.सर्वांनी आपल्या या जोखमीच्या कार्यात व अत्यंत धावपळीच्या जीवन प्रणाली मध्ये १५ ते २० मिनिटं नियमितपणे ध्यान करणे ,सकारात्मक पुस्तकांचे वाचन करणे निसर्गाच्या सानिध्यात फिरणे,सकारात्मक विचारांचे चिंतन,मनन करणे,आनंदी मन ठेवण्याकरिता आवश्यक असणारे जीवनप्रणाली चे अवलोकन करावे.

संत ज्ञानेश्वर माऊली यांनी ध्यान योगाचे महत्त्व विशद केले आहे.या बाह्य जग जगतापेक्षा कितीतरी विस्तीर्ण मोठे जग आपल्या अंतरात्म्यामध्ये दडलेले आहे. त्याकरिता ध्यान प्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे .‘‘विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले, अवघेचि जाहले देह ब्रम्ह‘‘ याप्रमाणे पंधरा ते वीस मिनिटं ध्यान करण्याचे आवाहन लेखक व प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड यांनी केले. पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी प्रास्ताविक केले.

---

# जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहक हितांवर चर्चा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तहसील कार्यालय तथा ग्राहक पंचायत पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ग्राहक दिनानिमित्त मंगळवारी ग्राहक हक्क व समस्यांवर चर्चा सत्र आयोजित करण्यात आले.

पैठण तहसील कार्यालयातील सभागृहात जागतिक ग्राहक दिनानिमित्त दीपप्रज्वलन करून स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी सुरक्षित उत्पादने व आत्मविश्वासु ग्राहक या विषयावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य नानक वेदी यांनी माहिती देऊन ग्राहक हक्क जनजागरण मोहिमेत सहभाग घेऊन ऑनलाइन फसवणुकीपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले यावेळी नायब तहसीलदार प्रभाकर घुगे, पुरवठा निरीक्षक अधिकारी कैलास बहुरे, संरक्षण परिषदेचे रावसाहेब नाडे, ग्राहक पंचायतचे अभ्यास प्रमुख राजन सातघरे, अध्यक्ष राम आहुजा, मदन आव्हाड यांनी ग्राहक समस्या वर आपले विचार मांडुन तहसील प्रशासनाने कार्रवाई करण्याची मागणी केली.

यावेळी स्थानिक गॅस एजन्सीकडून गॅस रिसीट घेण्यासाठी ग्राहकांना उन्हापासून बचावाची सुविधा उपलब्ध करून देणे, दररोज गॅस स्टॉक व गॅस टाकी वितरणाची माहिती फलकावर लावणे, महावितरणकडून ग्राहकांच्या तक्रारींसाठी मोबाईल क्रमांक जाहीर करणे, विजेची ये-जा थांबवून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे फोन कार्यालयात उपलब्ध करून देणे, रेशन कार्डाशी संबंधित कामे लवकर करण्याची सुविधा देणे तसेच शासकीय कार्यक्रमास अनुपस्थित विभाग प्रमुखांना नोटीस जारी करणे आदी विषयांवर प्रश्नोत्तरे करण्यात आली. या कार्यक्रमास नायब तहसीलदार वैशाली कांबळे, , ज्योती पठाडे, तालुका संघटक विष्णू ढवळे, विष्णू सोनार, जगन्नाथ जमादार, कुणाल पिंपळे, यश आहुजा आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णु ढवळे यांनी तर आभार राम आहूजा यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अव्वल कारकून राजेश शिंदे, अमित बडवणे, विनोद शिरसाट, प्रदीप गायके, सोमनाथ ढगे आदींनी प्रयत्न केले.

---

## मनपा स्थायी समितीकडून १७३८ कोटींचे अंदाजपत्रक महासभेत सादर

**घरपट्टी-पाणीपट्टी कपातीसह लोकाभिमुख बदलांची शिफारस**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या वतीने आज महासभेत महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे १७३८ कोटींचे अंदाजपत्रक सभापती सुभाष लोंढे यांनी सादर केले. यावेळी महापौरांनी सभा तहकूब करत २७ मार्च रोजी अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात येईल, अशी माहिती दिली.

या प्रसंगी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहर लहारे तसेच स्थायी समिती सदस्य व नगरसेवक उपस्थित होते.

यावेळी बोलताना सभापती सुभाष लोंढे म्हणाले की, घरपट्टी



व पाणीपट्टीचा ठराव रद्द करून जुन्या दरानुसार आकारणी करावी. महापालिकेचे सध्याचे बजेट फुगीर असल्याची टीकाही त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज, कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश यांना वंदन करून तसेच या शहराला लाभलेल्या संत, विचारवंत व स्वातंत्र्यसैनिकांचा वारसा स्मरून आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करून मी सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकावर माझे मनोगत व्यक्त करीत आहे.

पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या सहकार्याने हे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

# संतांनी समाजाच्या उद्धारासाठी आयुष्य अर्पण केले - ह.भ.प. मारुती महाराज झिरपे

**। हनुमान जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प.मारुती महाराज झिरपे यांची कीर्तन सेवा । नालेगाव गाडगीळ पटांगणात भक्तिमय वातावरण; संत विचारांचा जागर**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ व पावन हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने श्री हनुमान जयंतीनिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ह.भ.प. मारुती महाराज झिरपे यांची कीर्तन सेवा मोठ्या भक्तिभावात संपन्न झाली. या कीर्तन सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

कीर्तनामध्ये बोलताना ह.भ.प. मारुती महाराज झिरपे यांनी सांगितले की, महाराष्ट्राची भूमी संतांच्या पदस्पर्शाने पावन झाली असून संतांचे कार्य अत्यंत महान आहे. त्यांनी समाजाला योग्य विचारांची दिशा दिली आणि लपलेले ज्ञान जनतेसमोर आणले.

ते पुढे म्हणाले की, नाथ, चैतन्य आणि दत्त संप्रदाय यांचे एकत्रीकरण होऊन वारकरी संप्रदायाची निर्मिती झाली. सध्याच्या काळात ''आपल्यापेक्षा कोणी मोठे होऊ नये'' अशी प्रवृत्ती वाढत चालली असली, तरी गुरु व शिक्षकांना आपला शिष्य मोठा झालेला पाहायला आवडतो, हीच खरी परंपरा संतांनी घालून दिली आहे.

संतांनी नागरिकांच्या घराघरात जाऊन समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले. त्यांच्या विचारांमुळेच आपली संस्कृती व परंपरा आजही टिकून आहे. त्यामुळे संतांचे विचार प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

माजी नगरसेवक दत्तात्रेय मुदगल यांनी गेल्या ३४ वर्षांपासून नालेगाव गाडगीळ पटांगण येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करून संत विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये अध्यात्मिकतेची भावना वाढीस लागली असून समाज एकत्र येण्यास मदत होत आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून संत परंपरेचा वारसा पुढील पिढीकडे पोहोचवण्याचे कार्य होत असून, अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक व आध्यात्मिक वातावरण निर्माण होत असल्याचे यावेळी दिसून आले.

# तणावग्रस्त जीवनातील संकटांचा मुकाबला करण्यासाठी श्रीरामनाम हे अत्यंत प्रभावी साधन – हभप मिलिंद महाराज चवंडके

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या तणावग्रस्त जीवनातील संकटांचा मुकाबला करण्यासाठी श्रीरामनाम हे अत्यंत प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे अहिल्यानगर जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

श्रीराम नवमीचे सुदिनी विश्व हिंदू परिषदेच्यावतीने शहराच्या विविध भागात आयोजित करण्यात आलेल्या श्रीरामोत्सव सोहळ्यात प्रवचन करताना ते बोलत होते. जिल्हा धार्मिक यात्रा संघ प्रमुख राजेंद्र चुंबळकर यांनी त्रिवार ओंकार, एकात्मता आणि विजय मंत्र म्हटले.

आगरकर मळ्यात झालेल्या सोहळ्यात प्रखंड मंत्री विरेंद्र शिंदे यांनी स्वागत केले. जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्याची माहिती दिली. यावेळी बाळासाहेब दळवी, हनुमंत पाटील, रोहन भोसले, संकेत गांगुर्डे, पुनम बारसे, अनिता बारसे, भारती लंगोटे, वृषाली भोसले, नलिनी बसापुरे, सविता बारसे, महानंदा बारसे, आशा जाधव, उज्वला डांगे, निर्मला ढोले यांच्यासह परिसरातील



भाविक उपस्थित होते.

पाइपलाईन रोडवरील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष वसंत सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या श्रीरामोत्सवास दिनेश हिरगुडे, शुभम शिंदे, अमित खामकर, निखिल शिंदे, सुरज शिंदे, संतोष परदेशी, लवकुश धनगर आदींसह परिसरातील बालगोपाळ आणि नागरिक उपस्थित होते.

श्रमिक नगरमधील श्रीरामोत्सवास

विराट कदम, अमित खामकर, दिपक ससाणे, सुरेश शिंदे, देवा शिंदे, बाबासाहेब शिंदे यांचेसह परिसरातील भाविक उपस्थित होते.

श्री. मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले, आपल्या संपर्कात आलेल्या सर्वांचा हृदयापासून आदर करावा. समाज मन ओळखावे. प्रसंगी आपल्या सुखाचा सहजतेने त्याग करावा. आपल्या परिवारातील एकजुट – नातेसंबंध – आपलेपणा सांभाळावा. एकपत्नी व्रत सांभाळताना शुध्द चारित्र्य जपावे. मोठ्या कामात मदत करणाऱ्या छोट्यातील छोट्या खारूताईचेही कौतुक करावे. श्रध्दा –विश्वास आणि भाव ओळखावा, असे प्रभू श्रीराम आपल्या कृती मधून सांगतात. केवटच्या सर्व इच्छा पूर्ण करतात. शबरीची उष्टी बोरे खाऊन भाव–भक्तीला सर्वोच्च महत्त्व देतात. सुग्रीवाला दिलेले मैत्रीचे वचन निभावताना वालीचा वध करतात. बिभीषणाला सोन्याच्या लंकेचे राज्य देतात. सीतामाईच्या मुक्तीसाठी स्वतःच्या प्राणाची आहुती देणाऱ्या जटायूचा अंतिम संस्कार करतात. नाशिकजवळ घोटीच्या बाजूला टाकेद गावात जटायूचे मंदिर आहे.

अयोध्येचे श्रीराम मंदिर हिंदूंचा तेजस्वी इतिहास आणि बलिदानाची गाथा नव्या पिढीला कायम सांगत राहिल. सीतामाईला अहिंसेचे तत्व सांगताना श्रीराम म्हणतात – धर्मकार्याच्या वाटेमध्ये जर कोणी बाधा आणत असेल तर अशा हिंसकाची हिंसा हीच वास्तव अहिंसा आहे.

श्रीरामाच्या आदर्शावर चालणारे राज्य म्हणजेच रामराज्य. चारित्र्यसंपन्न समाजच रामराज्य प्रस्थापित करू शकतो. श्रीरामनवमी साजरी करताना प्रभू श्रीरामाचा एक तरी गुण आपल्या आचरणात येईल, असा संकल्प करावा. आपला समाज, आपला धर्म, आपले राष्ट्र आणि आपला अखंड हिंदुस्थान यासाठी वेळ द्यावा, असे आवाहन मिलिंद महाराज चवंडके यांनी केले. त्यांच्या रसाळ अमृतवाणीमधून श्रीराम चरित्र श्रवण करताना उपस्थित रामभक्त राममय झाले होते.

# मराठी राजभाषा प्रावीण्य परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेची दमदार कामगिरी

**राज्यात प्रथम क्रमांकासह ७८ विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीत झेप । अनिश गोरे राज्यात प्रथम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेतील विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा प्रावीण्य परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेचा नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षीही राज्यात प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या विद्यार्थ्याने मानाचा तुरा रोवला असून, शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची छाप उमटवली आहे. अनिश विनायक गोरे राज्याच्या गुणवत्ता यादीत प्रथम आला आहे.

या परीक्षेत शाळेतील तब्बल १० विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले, तर ३२ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आणि ३६ विद्यार्थी केंद्र गुणवत्ता यादीत चमकले. एकूण ७८ विद्यार्थ्यांनी विविध गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, लाईफ मेंबर सदस्य शिवाजी लंके व प्रमोद तोरणे, तसेच प्राचार्य छाया काकडे आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.

या यशामागे शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, वर्गशिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहोकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, रूपाली पांडुळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, कांचन मदने आणि पूनम धाडगे यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले.

# रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना करिअरची नवी दिशा

**।मासूम संस्थेच्या उपक्रमातून मार्गदर्शन; शिक्षणासोबत उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा । दिवसा कष्ट, रात्री शिक्षण । विद्यार्थ्यांना मिळाले करिअरचे मार्गदर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील नव विद्या प्रसारक मंडळाच्या सरस्वती मंदिर नाईट स्कूलमध्ये मासूम (मुंबई) संस्थेच्या वतीने रात्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला आजी-माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभर मेहनत करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या कार्यशाळेच्या माध्यमातून भविष्यासाठी नवी दिशा देण्यात आली.

या कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून गजाला शेख आणि अनुराधा पवार यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअरच्या संधींबाबत सखोल माहिती दिली. आजच्या बदलत्या काळात उपलब्ध असलेल्या विविध क्षेत्रांतील संधी, त्या मिळवण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये, तसेच शिक्षणाच्या विविध वाटा यांचा त्यांनी सविस्तर उहापोह केला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडी-निवडी आणि क्षमतांचा विचार करून योग्य करिअरची निवड करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.



यावेळी मासूम संस्थेचे जिल्हा समन्वयक आशिष सूसरे आणि प्रतिनिधी महेंद्र म्हसे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. करिअर निवडताना केवळ नोकरीच्या संधीच नव्हे, तर स्वतःचा विकास, कौशल्यवृद्धी आणि भविष्यातील बदलत्या संधींचा विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या मार्गदर्शन कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा मिळते. शिक्षणासोबत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष स्वप्नील वाघ आणि उत्तम खैरे यांचीही विशेष उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. तसेच या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सातळकर, सचिव निलेश वैकर व कार्यकारी मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन देवका लबडे यांनी मानले.

# के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने महिला गौरव पुरस्काराचे वितरण सोहळा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या गौरवासाठी कै. सौ. इचरजबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्कार २०२६ वितरण सोहळा स्वर्गीय इचरजबाई हस्तीमलजी मुनोत यांच्या स्मृतिदिनी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी आदरणीय डॉ. पंकजजी आशिया होते.

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आशिया म्हणाले की, ''मुनोत ट्रस्टच्या वतीने महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडते, याचा मला विशेष आनंद आहे.'' त्यांनी पुढे महिलांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करत समाजाला नवी दिशा दिल्याचेही नमूद केले.

अहिल्यानगरमधील महिला विविध क्षेत्रात पुढे येत असून त्यांच्या कार्यामुळे समाज प्रगत होत आहे, असे मत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अहिल्यानगर कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी () आदरणीय पल्लवी विजयवंशी यांनी व्यक्त केले. स्त्रीने जिद्दीने उभे राहणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

संस्थेचे विश्वस्त संचालक श्री. किशोर मुनोत यांनी पुरस्कार प्राप्त महिलांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेऊनच हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे सांगितले. तसेच ते म्हणाले केशरगुलाब परिवारातील व माता पिता कडून फक्त संपत्ती मिळाली नसून संस्कार देखील मिळाले म्हणून 'मानवतासे बढकर कोई धर्म नही 'या उक्तीने मी कार्यरत आहे. महाविद्यालयाचा परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी प्रास्ताविकात या पुरस्कारामागील उद्दिष्ट स्पष्ट केले.

यावर्षीचा सन्मान डॉ. मार्सिया वॉरेन यांना वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी, श्रीमती उषा देशमुख यांना औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रदान करण्यात आला. त्यांनी ''पुरस्कार मिळाल्यावर जबाबदारी अधिक वाढते'' असे सांगत आपला प्रेरणादायी प्रवास मांडला. तसेच समाजातील मुलांना योग्य संस्कार देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

श्रीमती मीनाताई मुनोत यांना सहकार व पत्रकारिता क्षेत्रातील कार्यासाठी गौरविण्यात आले. तसेच सौ. रूपाली मुनोत यांना स्नेहालय स्थित स्नेहांकुर दत्तक विधान केंद्रा द्वारे करण्यात येत असलेल्या समाजसेवा क्षेत्रातील योगदानासाठी सन्मानित करण्यात आले. त्यांनी स्नेहांकुरच्या कार्याची माहिती देत हा सन्मान प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. मृदुला राहुल मुनोत यांना एमबीबीएसमध्ये गोल्ड मेडल मिळवल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्टचे सचिव श्री. लालचंदजी मुनोत, श्री प्रकाशजी मुनोत व श्री आनंद राम मुनोत, सौ. सुजाता किशोर मुनोत ,प्राचार्य डॉ. खासेराव शितोळे, सदस्य, अहमदनगर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे पदाधिकारी, विविध मान्यवर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे वासंतीक नवरात्रोत्सवाची होमहवन व कुमारिका पुजनाने सांगता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे वासंतीक नवरात्र महोत्सव सांगता देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, शुभम दहिफळे, ॲड. श्रीमती ऋतीका कराळे यांचे हस्ते होमवहनाचा कार्यक्रमासह वासंतीक नवरात्राची सांगता झाली.

वासंतीक नवरात्र महोत्सवामध्ये शांतीपाठ, महासंकल्प, पुण्याहवाचन, चडीयाग हवन, चौसष्ठ योगीनी दशमहाविद्या, अष्टभैरव इ. देवदेतांसह, अभिषेकासह षोडशोपचार, कुमारिका पुजन केले. वासंतीक नवरात्र महोत्सव सांगता व होमहवन कार्यक्रम असल्यामुळे पहाटेपासुन



भावीकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केलेली होती. वासंतीक नवरात्रास चैत्र नवरात्र असेही म्हणतात, हे हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे पर्व मानले जाते. वासंतीक नवरात्र हे आत्मशुद्धी आणि नवीन सकल्पांचे प्रतीक मानले जाते. सकल भारतवासीय देवीभक्तांचे उत्तम आरोग्य व धनधान्य, सुख समृध्दी प्राप्त व्हावी असा महासंकल्प करुन प्रार्थना करण्यात आली.

होमहवन कार्यक्रमास देवस्थानचे विश्वस्त ॲड श्री विक्रम वाडेकर, श्री बाळूशेट लाहोटी. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, सौ. लता दहिफळे, सौ. योगीता दहिफळे, सौ. कावेरी लाहोटी, सौ. पूजा वाडेकर, संतोष शर्मा, प्रसाद कुलट, तसेच कर्मचारी, ग्रामस्थ व भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे पौरोहित्य वे. नारायण देवा सुलाखे, वे. भुषणदेवा, वे. निखील सुलाखे, महेश झेंड, विशाल किडे, शुभम जोशी, सिध्देश्वर रामदासी, विशाल सुलाखे, भगवान जोशी यांनी केले. यावेळी पिंपरी चिंडवड किवले येथील उद्योजक वे देवीभक्त चंद्रशेखर कातळे नगरसेवीका सौ. रेश्मा बापुजी कातळे परिवाराच्या वतीने मोहटे येथील रेणुका विद्यालयातील विद्यार्थीनींना वस्त्रदान , कुमारिका पूजन व अनदान करणेत आले.

(पान १ वरून)

## गॅस रिपेरिंग करणारा आरोपी जेरबंद

पारिजात चौक जवळील आम्रपाली गार्डनसमोर असलेल्या पत्र्याच्या गोडावूनमध्ये घरगुती गॅस टाक्यांमधून व्यवसायिक गॅसटाक्यांमध्ये रिफिलिंग करीत आहे. त्यानुसार पथकाने नमूद ठिकाणी खात्री केली असता, सदर ठिकाणी आरोपी शहानवाज सय्यद हा घरगुती गॅसटाक्यांमधून व्यावसायिक गॅसटाक्यांमध्ये रिफिलिंग करत असतांना दिसून आला. या ठिकाणावरून एचपी कंपनीच्या दहा गॅसटाक्या, दोन इलेक्ट्रिक मशीन आदी एकूण ३३ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरच्या गॅस टाक्या कोठून आणल्या तसेच रिफीलींग कोणाच्या सांगण्यावरुन करत असल्याबाबत विचारपूस करता त्याने साद अन्वर खान (रा. घासगल्ली मुकुंदनगर) याच्या सांगण्यावरून हा उद्योग करत असल्याचे सांगितले पथक साद खानच्या शोधात आहे.दोघा आरोपीविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २२३, सह जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३, ७, सह एलपीजी (पुरवठा आणि वितरण नियमन) आदेश २००० चे कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथक्यातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार, भाग्यश्री भिटे, सोनल भागवत यांच्या पथकाने केली.

## गावठी कट्टा बाळगणारा सोनई शिवारातून ताब्यात

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार बिरप्पा करमल, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, किशोर शिरसाठ, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार सोनल बागवत चालक उमाकांत गावडे, महादेव भांड तसेच दिगंबर कारखेले, मल्लिकार्जुन बनकर, उमेश खेडकर नेम. सायबर पोलीस स्टेशनचे पथक यांनी केली.

## राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली - धनंजय जाधव

भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,उद्योजक विनोद पुंड,अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष अँड.विनोद गायकवाड, डि.आर. गायकवाड,शहराध्यक्ष विशाल माने,शहर उपाध्यक्ष किशोर जाधव,सचिव राजेंद्र गायकवाड, बाबासाहेब जाधव, महादेव माने,संतोष गायकवाड,के एस माने,फुलचंद जाधव, बी.के.माने,शिवनाथ गायकवाड,भिमराज गायकवाड, हौशीराम गायकवाड,मुलुखुराज गायकवाड,कुंडलिक जाधव, आसाराम जाधव,निनाद गायकवाड,संदीप माने,पार्थ गायकवाड आदींसह समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

अँड.विनोद गायकवाड म्हणाले,अहिल्यानगर येथील कैकाडी समाज संघटनेच्या वतीने दरवर्षी सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या शिकवणीप्रमाणे कैकाडी समाजाची वाटचाल सुरू आहे.प्रत्येकाने एकमेकांशी वागताना प्रेमाने वागावे.तसेच माणुसकीचा धर्म पाळून माणसाला माणसाप्रमाणे वागणूक द्यावी.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांचे विचार सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत.

विशाल माने म्हणाले,राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती दरवर्षी मोठ्या भक्ती भावाने साजरी केली जाते.महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या थोर महापुरुषांनी सर्व समाजाला शिक्षण दिले आहे.महात्मा फुले यांचे भव्यदिव्य स्मारक अहिल्यानगर शहरात होत आहे.याचा सर्व समाजाला अभिमान आहे.महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक लवकर पूर्ण व्हावे.यासाठी अहिल्यानगर येथील कैकाडी समाजाने महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीला जाहीर पाठिंबाचे पत्र दिले आहे.

महाप्रसादाचे आयोजन भीमराज जाधव परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर,बीड,जालना, नाशिक,जळगाव,अमरावती येथील समाज बांधव व भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.